**प्रकल्प प्रवर्तक मे. गार्डीयन कॉस्टींग प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ५७ (पीटी), १०८ (पीटी),११५, ११६, ११७, १२०, १३५ (पीटी) आणि ९२/१, गाव - अबिटघर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पाच्या एम. एस. बिलेटसचे उत्पादन २०,००० टीपीएम (२,४०,००० टीपीए) पासून ६०,००० टीपीएम (७,२०,००० टीपीए) पर्यंत तसेच टीएमटी बार्स/चॅनल्स/एगल्स/बीम/संरचना/रॉड/वायर रॉड यांचे उत्पादन २०,०००टीपीएम (२,४०,००० टीपीए) पासून ६०,००० टीपीएम (७,२०,००० टीपीए) पर्यंत विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. गार्डीयन कॉस्टींग प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ५७ (पीटी), १०८ (पीटी), ११५, ११६, ११७, १२०, १३५ (पीटी) आणि ९२/१, गाव - अबिटघर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पाच्या एम. एस. बिलेटसचे उत्पादन २०,००० टीपीएम (२,४०,००० टीपीए) पासून ६०,००० टीपीएम (७,२०,००० टीपीए) पर्यंत तसेच टीएमटी बार्स/चॅनल्स/एगल्स/बीम/संरचना/रॉड/वायर रॉड यांचे उत्पादन २०,०००टीपीएम (२,४०,००० टीपीए) पासून ६०,००० टीपीएम (७,२०,००० टीपीए) पर्यंत विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता प्रकल्प स्थान गट नं. ५७ (पीटी), १०८ (पीटी), ११५, ११६, ११७, १२०, १३५ (पीटी) आणि ९२/१, गाव - अबिटघर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री किशोर केर्लीकर, उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. भवानजी आगे पाटील, उपविभागीय दंडाधिकारी (प्रांत), वाडा, जिल्हा-पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री बाबासाहेब कुकडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. गार्डीयन कॉस्टींग प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ५७ (पीटी), १०८ (पीटी), ११५, ११६, ११७, १२०, १३५ (पीटी) आणि ९२/१, गाव - अबिटघर, तालुका-

वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पाच्या एम. एस. बिलेटसचे उत्पादन २०,००० टीपीएम (२,४०,००० टीपीए) पासून ६०,००० टीपीएम (७,२०,००० टीपीए) पर्यंत तसेच टीएमटी बार्स/चॅनल्स/एगल्स/बीम/संरचना/रॉड/वायर रॉड यांचे उत्पादन २०,००० टीपीएम (२,४०,००० टीपीए) पासून ६०,००० टीपीएम (७,२०,००० टीपीए) पर्यंत विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ब-१ शेड्युल ३ (ए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण

आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक १५-०३-२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार , दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६५/२०२२, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०९२०एफटीएस०२२२ दिनांक २०/०९/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पालघर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,कल्याण-३<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कल्याण | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक सकाळ (मराठी) व फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी) या वृत्तपत्रात जनसुनावणीबाबत दिनांक ०९-०९-२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर,

५) उप विभागीय अधिकारी-वाडा, तालुका-वाडा,जिल्हा-पालघर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती-वाडा, तालुका-वाडा,जिल्हा-पालघर,

७) तहसीलदार, तहसील कार्यालय,वाडा,, जिल्हा- पालघर,

८) सरपंच, ग्रुप-ग्रामपंचायत, अबिटघर, तालुका-वाडा, जिल्हा- पालघर

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२,

१०) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,

११) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे,

१२) उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई,

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी म.प्र.नि. मंडळास ईमेलव्दारे व पत्राव्दारे एकही आक्षेप प्राप्त झाला नसल्याचे आयोजकाने सांगितले.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी वा तोंडी स्वरुपात सुनावणी दरम्यान देण्यात याव्या असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय विभाग, मुंबई यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाची एकूण किंमत रुपये १४७.५ कोटी असून प्रस्तावित ३७० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार प्रकल्पात मिळू शकतो. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसाय व रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**<u>खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/स्पष्टीकरण/आश्वासनेः -</u>**

१) **<u>श्री भरत गोविंद जाधव, राहणार-अबिटघर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी कंपनीच्या विस्तारिकरणासाठी घेतली आहे. चर्चेत वृक्षारोपणाचा विषय उपस्थित करण्यात आलेला होता. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रतीवर्षी वृक्षारोपणासाठी सुमारे दोन लाख खर्च करणार असल्याचे | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आमच्या प्रकल्पाला लागूनच एक भूखंड आहे. त्यावर काहीही नाही. तेथे वृक्षारोपण व हरितपट्टा विकसित करण्यात येतील. जेवढा हरितपट्टा करणे बंधनकारक आहे, तो पूर्ण करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | सांगितले. खरोखरच खर्च करत असताना वृक्षारोपण कुठे करतात? झाडे लावा, झाडे जगवा हा शासनाचाही नियम आहे. तर त्याअनुषंगाने प्रकल्प प्रवर्तकांचे काय नियोजन आहे?<br>आपल्या प्रकल्प भूखंडाच्या ३३% वृक्षारोपण करणे बंधनकारक आहे. तर तेवढी जागा प्रकल्प भूखंडात उपलब्ध आहे काय? | |
| २) | प्रकल्पात ४८४ कामगार कार्यरत आहेत. त्यातील स्थानिक कामगारांचा टक्का किती आहेत? तो वाढविला गेला पाहिजे. विस्तारिकरणा नंतर जवळजवळ दुप्पट कामगार लागतील. तर माझी विनंती आहे की विस्तारिकरण प्रकल्पात कुशल, अर्धकुशल, अकुशल संवर्गात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | प्रकल्प विकसित करणे हा ग्रामीण विकासाचा एक भाग आहे. त्यामुळे गाव विकसित होते. मी स्थानिक आहे म्हणून सांगू इच्छितो की गावामध्ये घनकचरा व सांडपाण्याची शास्त्रीयदृष्ट्या प्रक्रिया व विल्हेवाट व्यवस्थापन नाही. त्यामुळे गाव व | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आम्ही तीन कंपन्या असून तिघे मिळून एक घंटागाडी ही ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन देऊ. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनी यांनी समन्वयाने सुसज्ज घंटागाडीचा विषय जर मार्गी लावला, तर गावाला निश्चितच त्याचा फायदा होईल. | |
| ५) | प्रकल्पात छोट्या मोठ्या घटना घडत असतात. रात्री एखादा अपघात झाल्यास त्वरित वैदकीय मदत मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध केल्यास कंपनीबरोबर गावालाही त्याचा लाभ मिळेल. त्यामुळे गावासाठी नैतिक जबाबदारी समजून ह्या गोष्टी कराव्यात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की बैठकीत जो रुग्णवाहिकेचा प्रस्ताव करण्यात आला. तो स्विकारण्यात येत आहे. एक रुग्णवाहिका गावासाठी देण्यास आम्ही तयार आहोत. |

२) **<u>श्री गणेशभाऊ भोईर, राहणार-अबिटघर,तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | औद्योगिकीकरणाचा विचार केल्यास कंपनीच्या विकासाबरोबरच येथील स्थानिकांचाही विकास झाल्याचे दिसून येते. जेथे कंपन्या आल्या, तेथील लोकांचे राहणीमान नेहमीच उंचावते. ही स्थानिकांची साधी अपेक्षा असते की कंपनीने गावातील | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | सामाजीक बांधिलकीचे उपक्रम मग ते शैक्षणिक, वैदकीय असतील ते हाती घेऊन गावातील लोकांना रोजगार द्यावा. तसे केल्यास स्थानिकांचा कोणत्याही औद्योगिककीकरणास विरोध नसेल. त्याचप्रमाणे बैठकीत मुद्दा उपस्थित केल्यानुसार जर घंटागाडी उपलब्ध केल्यास निश्चितच त्याचा फायदा कंपनीस व गावास होईल. | |

**३) <u>श्री किशोर केर्लीकर, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सादरीकरणाचे सूक्ष्म निरिक्षण केल्यानंतर असे लक्षात येते की प्रकल्पामध्ये दोन प्रवर्तक भटटया उभारल्या जाणार आहे. त्यामुळे दोन अधिक चिमण्या उभारण्यात येणार आहेत का? याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात दोन प्रवर्तन भट्टी व दोन चिमणी लावण्याचा प्रस्ताव आहे. मात्र दोन्ही चिमण्यांना एकत्रित (combined) हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा म्हणजे बॅग फिल्टर लावण्याचा प्रस्ताव आहे. |
| २) | प्रकल्पात CEMS (Continuous Emissions Monitoring System) | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पीएम, सल्फर-डाय-ऑक्साईड, |

| | | |
|---|---|---|
| | कार्यान्वित करणार आहात, त्यात कुठले पॅरामिटर्सचे विश्लेषण करणार आहेत? | नायट्रोजन-डाय-ऑक्साईड हे पॅरामिटर्सचे विश्लेषण केले जाणार आहेत. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की ज्यांना लेखी स्वरुपात निवेदन द्यायचे असल्यास तेही ते देऊ शकतात.

४) **श्री बाबासाहेब कुकडे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सादरीकरणातील पान नं.२२. कार्यरत प्रकल्पात जो स्लॅग उत्पन्न होतो, तो ८०० टन प्रतिमास असून विस्तारिकरणानंतर तो १६०० टन प्रतिमास होईल व एकूण २४०० टन होईल. तर त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल. येथे नमूद केलेले आहे की प्रकल्पातील रस्ते तयार करण्यास किंवा विटा तयार करण्यास उपलब्ध करण्यात येईल. तर आपले काय नियोजन आहे? | प्रकल्पातील अंतर्गत रस्ते कॉंक्रीट करण्यासाठी सपाट करताना स्लॅग वापरण्यात येईल. त्याचप्रमाणे स्थानिक वीटा तयार करण्या-या कारखानदारांबरोबर करार करण्यात येईल व अतिरिक्त स्लॅग त्यांना पुरविण्यात येईल. |
| २) | स्टील कंपन्यात दोनच मुद्दे असतात, एक हवा प्रदूषण व स्लॅग विल्हेवाट. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जे नवीन तंत्रज्ञान येत आहे त्याचा अभ्यास |

| | | |
|---|---|---|
| | याबाबत काही नवीन तंत्रज्ञान असेल, तर ते आत्मसात करण्यात यावे. | करुन प्रकल्पात आत्मसात करण्यात येतील. आता नवीन तंत्रज्ञान आलेले असून स्लॅगचे रुपांतर हे रेतीमध्ये (sand) करण्यात येते. त्याचा अभ्यास करुन पुढे स्लॅगची विल्हेवाट लावण्यात येईल. |

प्रतिनिधी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यांनी सर्व उपस्थितांतर्फे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पुढील मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे जनसुनावणी बैठकीत स्वागत करून सांगितले की शासनाने एखादा प्रकल्प कार्यान्वित होताना त्याठिकाणी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक केलेले आहे, कारण प्रकल्प परिसरातील नागरिकांना प्रस्तावित प्रकल्पाचे उत्पादन व प्रकल्पास बंधनकारक असलेला पर्यावरण व्यवस्थापन योजनांचा माहिती स्थानिकांना अवगत करणे, त्या योजना शासनाच्या मानकांप्रमाणे आहेत का नाही याची शहानिशा करणे, सदरहू प्रकल्पाचा ग्रामस्थांना काय फायदा होईल याची माहिती देणे. जोपर्यंत ग्रामस्थ व उद्योग यांच्या समन्वय होत नाही, तोपर्यत त्या परिसरात उद्योगस्नेही वातावरण निर्माण होणार नाही.

ते म्हणाले की ग्रामस्थांनी ज्या काही सामाजीक मागण्या केल्या, त्यास सकारात्मक प्रतिसाद हा प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेला आहे. त्याबद्दल ग्रामस्थांचे आणि

कंपनी प्रशासनाचे अभिनंदन करतो. ही उद्योग उभारणी स्थानिकांचे जीवनमान उंचावणारा आहे. कारण प्रकल्पातील रोजगाराबरोबरच येथील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड वाढ होणार आहे.

या प्रकल्पाविषयी जे तांत्रिक प्रश्न सदस्य व आयोजक यांनी विचारले त्यासही पर्यावरण सल्लागार यांनी समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत.

अध्यक्ष यांनी सांगितले की कुठल्याही उद्योगात आज जे तंत्रज्ञान आहे, त्यात काही वर्षांनी आधुनिकता येते. तर प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणार संभाव्य परिणाम कमी कसा करता यैईल याचे मार्गदर्शन पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प प्रवर्तकांना करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात कुशल, अर्धकुशल संवर्गात रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यासाठी स्थानिक युवक युवतींनी त्यानुसार कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने स्वतःला रोजगारक्षम बनविणे आवश्यक आहे.

अध्यक्ष यांनी येथील कंपन्यांना आवाहन केले की येथील सर्व कंपन्यांनी एकत्रित येऊन गट किंवा संघ स्थापन करुन त्यांना आवश्यक असणारे कौशल्य स्थानिक युवक युवतींना देण्यासाठी प्रशिक्षण योजना राबविण्यात यावी. कंपनी प्रशासनाने स्थानिकांना रोजगार देऊन भविष्यात विविध उपक्रमांमध्ये स्थानिकांना समावेश करुन घ्यावे. प्रकल्पाने प्रदूषणाबाबत पारित केलेली मानके पाळावीत. तरी हे सांमजस्याचे वातावरण ठेवावे. त्यांनी प्रकल्पास शुभेच्छा दिल्या,

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मा. अध्यक्ष यांनी सूचित केल्याप्रमाणे सर्व सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृतात समावेश करुन ते इतिवृत शासनास सादर करण्यात येईल. तेथील तांत्रिक समिती स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा विचार करणार आहे. या प्रकल्पास मान्यता देणे किंवा न देणे याबाबत समिती पुढील निर्णय घेत असते.

आयोजक यांनी सर्व उपस्थितांचे जनसुनावणीस राहून आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविले याबद्दल आभार व्यक्त करुन मा. अध्यक्ष याच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न झाली असे जाहिर केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून ही जनसुनावणी संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सोबत प्राप्त झालेले लेखी सूचना/आक्षेप : ०२ जोडण्यात आलेले आहेत.

**(किशोर केर्लीकर)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
कल्याण-३,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(बाबासाहेब कुकडे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(डॉ. भवानजी आगे पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उपविभागीय दंडाधिकारी (प्रांत),
वाडा, जिल्हा-पालघर,